# ४. नव्या युगाचे गाणे

**वि. भा. नेमाडे** (१९२०-२०१६) : कवी, लेखक. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्‌ध आहेत. त्यांच्या काव्यातून बदलत्या काळातील मानवी जीवनावरील मार्मिक भाष्य आढळून येते.

अतिशय वेगाने घडणाऱ्या वैज्ञानिक प्रगतीमुळे मानवी जीवनात मोठी क्रांती घडून येत आहे. विज्ञानाच्या पाठिंब्यामुळे शून्यातून नवे विश्व उभारण्याची जिद्‌द मानवामध्ये निर्माण होत आहे, मानवी जीवनातील दैन्य दूर होत आहे, नव्या प्रगतीच्या आशा पल्लवीत होत आहेत, हे या कवितेतून कवीने स्पष्ट केले आहे. प्रस्तुत कविता ही 'किशोर', जानेवारी १९९८ या मासिकातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**



अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती'
विज्ञानाचा प्रकाश आला घडे दिव्य क्रांती
नवयुग आले प्रभा तयाची पहा दिसत दिव्य
शून्यामधुनी विश्व उभारू जिद्‌द असे भव्य
हृदयांतरिच्या अशांततेचा वणवा झणि विझला
उत्कर्षाचा अन् प्रगतीचा मार्ग नवा दिसला
नवी चेतना अंतरि स्फुरली दुबळेपण गेले
नैराश्याच्या होळीमधुनी तेज नवे आले
मानवतेच्या मार्गावरती उठती जरि ज्वाला
अमरत्वाची फुले वेचुनी गुंफूया माला
  नको खिन्नता... नको दीनता
  नवसूर्य पहा उगवतो
  उत्कर्ष पहा झळकतो
  संघर्ष पहा बहरतो
नसानसातुन जोश उसळतो नव आशा चित्ती
अणूरेणूतुनि शब्द प्रगटति... 'चला चला पुढती'



## स्वाध्याय

**प्र. १. हे केव्हा घडेल ते लिहा.**

(अ) दिव्य क्रांती-

(आ) शून्यामधून विश्व उभारेल-

(इ) दुबळेपणाचा शेवट-

**प्र. २. खालील चौकटींतील घटनांचा पद्य पाठाधारे योग्य क्रम लावा.**

| | | |
|---|---|---|
| उत्कर्षाचा अन् प्रगतीचा मार्ग दिसला. | विज्ञानाचा प्रकाश आला. | क्रांती घडली. |
| हृदयातील अशांततेचा वणवा विझला. | नैराश्य नष्ट झाले. | |

**प्र. ३. खालील अर्थांच्या ओळी शोधा.**

(अ) माणसाच्या अंगी चिकाटी असली तर तो काहीही साध्य करू शकतो.

(आ) माणसाच्या अंगात जोश आणि मनात नवीन आशा निर्माण होतात.

**प्र. ४. तक्ता पूर्ण करा.**

| कवीला नको असणाऱ्या गोष्टी | विज्ञानामुळे प्राप्त होणाऱ्या गोष्टी |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |

**प्र. ५. तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

(अ) 'नवसूर्य पहा उगवतो', 'संघर्ष पहा बहरतो' या शब्दसमूहांतील कल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) कवितेतून व्यक्त होणारा कवीचा आशावाद स्पष्ट करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधा व लिहा.**

**(आ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द कवितेतून शोधून लिहा.**

(१) उजेड-

(२) तेज-

(३) रस्ता-

(४) उत्साह-

**उपक्रम :**

(अ) विज्ञानविषयक आणखी काही कविता मिळवून वाचा व त्यांचा संग्रह करा.

(आ) वैज्ञानिक प्रगतीमुळे घरात आलेल्या व जीवन सुलभ करणाऱ्या वस्तूंची यादी करा.

**प्रकल्प :** विज्ञानातील प्रगतीमुळे विविध क्षेत्रांत नवनवीन साधनांची भर पडली आहे. त्यांचा शोध घ्या व या क्षेत्रांतील साधनांची खालील तक्त्यात नावे लिहा. तुम्ही लिहिलेल्या साधनांची माहिती मिळवा.

| क्षेत्र | या क्षेत्रांतील नवनवीन साधने |
|---|---|
| (१) बांधकाम– | |
| (२) शिक्षण– | |
| (३) वैद्यकीय– | |
| (४) हवामानशास्त्र– | |
| (५) कृषी– | |
| (६) मनोरंजन– | |
| (७) खगोलशास्त्र– | |
| (८) संरक्षणशास्त्र– | |



## सारे हसूया.

**संजू** : मोहन, हे बोटावर आकडे का लिहिलेस ?

**मोहन** : अरे माझी आजी म्हणते, ''नुसत्या बोटावर आकडेमोड करता आली पाहिजे.''

**अजय** : थंडी वाजते तेव्हा तू काय करतोस ?

**विजय** : मी मेणबत्तीजवळ बसतो.

**अजय** : आणि खूप थंडी वाजली तर ?

**विजय** : मेणबत्ती पेटवतो.

LZXZ98

## मैत्री तंत्रज्ञानाशी

(इयत्ता आठवीतील मीनल व इयत्ता दहावीतील तेजस या दोन बहीणभावंडांतील हा संवाद.)



**तेजस :** मीनल, ए मीनल. अगं, आता आपली शाळा लवकरच सुरू होणार आहे. आपण यावर्षी आणलेली नवीन पुस्तके वाचायला हवीत. तू या वर्षीची नवीन पुस्तके पाहिलीस का?

**मीनल :** हो दादा, अरे मी पुस्तके वाचली नाहीत; पण बघितली आहेत.

**तेजस :** आवडली का तुला तुझी पुस्तके?

**मीनल :** अरे, मला तर माझी पुस्तके खूपच आवडली. मागील वर्षापेक्षाही या वर्षीची पुस्तके खूपच सुरेख आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध, त्यातील आकर्षक चित्रे, मांडणी मला खूपच आवडली.

**तेजस :** अगं, मला पण माझी पुस्तके खूप आवडली आहेत. अभ्यास करताना नक्कीच मजा येणार आहे.

**मीनल :** अरे, पण नवीन पुस्तकांत सर्व धड्यांखाली चौकटीत काहीतरी दिले आहे. ते काय आहे मला कळलंच नाही.

**तेजस :** दाखव बरं मला काय आहे ते!

**मीनल :** हे बघ. (पुस्तकातील पाठाखालील क्यू. आर. कोड दाखवते.)

**तेजस :** अगं, मीनल हा तर क्यू. आर. कोड आहे.

**मीनल :** क्यू. आर. कोड म्हणजे काय रे दादा? पूर्वीच्या पुस्तकांत तर असं काही दिलं जात नव्हतं!

**तेजस :** अगं, क्यू. आर. कोड म्हणजे क्विक रिस्पॉन्स कोड (Quick Response Code). अगं मोबाईलवर क्यू. आर. कोड स्कॅनर हे ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर डाऊनलोड करावे लागते.या सॉफ्टवेअरद्वारे हा क्यू. आर. कोड स्कॅन केल्यानंतर आपल्याला पाठ, कविता, इतर घटक या संबंधीच्या काही लिंक्स दिसतात. त्याद्वारा ऑडिओ, व्हिडिओ तसेच इतर पूरक साहित्य आपल्याला पाहायला मिळते. आपण ते ऐकू शकतो, पाहू शकतो आणि वाचूही शकतो. अभ्यासासाठी त्याचा आपल्याला पुन्हा पुन्हा वापरही करता येऊ शकतो.

**मीनल :** अरे, हे तर खूपच छान आहे! आपल्या पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधीची माहिती खूपच कमी वेळात उपलब्ध होत असल्यामुळे विविध प्रकारचे साहित्य व माहिती शोधण्यासाठीचा आपला वेळही वाचणार आहे. चल दादा, आपण लगेच आपल्या मोबाईलवर हे ॲप डाऊनलोड करून घेऊया आणि अधिकाधिक माहिती मिळवूया.